# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लां.प्र.वि., पहिली खबर क्र. 02, वर्ष 2018, दिनांक 17/01/2018
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7, 13(1)(ड) सह 13(2)
(ii) अधिनियम Act –, कलमे Sections –
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections –

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून 11/01/2018 वेळ ............, तारीख पर्यंत 16/01/2018 वेळ ............
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 11/01/2018, वेळ 15:35 वा.
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 02/18, तारीख 17/01/2018 वेळ 07:10 वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा –, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. –
Place of Occurrence : (a) Direction and Distance from P. S. – Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव शिवडी पोलीस ठाण्याच्या डाव्या बाजूच्या मोकळ्या जागेवरील पानाची टपरी, ठिकाणाचे नंबर ............, गल्ली ............, रस्त्याचे नाव ............
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण –, गाव –, पोस्ट –, तालुका –, जिल्हा –, राज्य ............
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name मोहम्मद शाहिद पटेल (b) वडिलांचे / पतीचे नाव मोहम्मद दाऊद पटेल
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 26 (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8454970724
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक –, दिल्याचा दिनांक –, दिल्याचे ठिकाण –, (f) व्यवसाय हमाल
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste –, जनजात Sub-Caste –
(h) पत्ता ............, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ............ पॅन नं. ............ वोटर्स नं. ............
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव शिवडी [illegible] रोड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण [illegible], गाव [illegible], पोस्ट ............, पो. स्टे. ............
Road प्लॉट नं. 2 Nearest identifiable place मुं. 15 Village Post P. Stn.
तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............, सध्याचा पत्ता ............
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

प्रमोद लवू जाधव, वय- 52 वर्षे, धंदा- नोकरी पोलीस हवालदार क्र. 26798
रा.ठी. आर.सी.एफ. कॉलनी, टाईप बी/4/55, [illegible], चेंबूर, मुं. 74

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs)–8-2016–PA3–(K) 460

फिर्यादी मोहम्मद शाहिद सय्यद वय - 26 वर्षे, धंदा - हमाली, रा.ठी. शिवडी फॉसबेरी रोड, ऑईलस्टेट पेठ कंपनीजवळ, प्लॉट नं. 2, शिवडी, मुंबई-15 यांचा जबाब स्वतंत्र कागदावर नोंदवून तिचे गुन्ह्याची पहिली खबर समजून गुन्ह्याच्या कागदपत्री समाविष्ट करण्यात आली.

समक्ष

Shahid

गोविंद

(गोविंद लांडे)

पोलीस निरीक्षक

लो.प्र.वि. मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद, तारीख, वेळ व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवकाने फिर्यादी यांचे वडीलांची शिवडी पोलीस ठाणे चॅप्टर केस क्र. 43/17 कोर्ट केस क्र. 100/17 मध्ये मदत करण्याकरिता रु. 2000/- लाचेची मागणी करुन फिर्यादीच्या हातुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडले म्हणुन भ्र.प्र. अधिनियम कलम 7, 13(1)(5) सह 13(2) प्रमाणे गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ......
District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Shahid

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

(signature)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अरविंद लाड
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ......
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख......
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्याद

दिनांक १७/०१/२०१८

मी, मोहम्मद शाहीद सय्यद, वय–२६ वर्षे, धंदा–हमाली –रा.ठि. शिवडी फॅसबरी रोड, अॅडव्हान्स पेन्ट कंपनीजवळ, प्लॉट नं. २, मुंबई १५. मो.क्रं. ८४५४९७०७२४.

मी, वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे आईवडिल व भाऊ नामे जावेद व बहिण यासिन यांचेसोबत जन्मापासून राहावयास आहे. मी शिवडी विभागातच हमालीचे काम करून आमच्या कुटूंबाला हातभार लावतो.

दिनांक २६/०७/२०१७ रोजी माझे वडिल नामे श्री. मोहम्मद दाऊद सय्यद यांचेविरूध्द शिवडी पोलीस ठाणे येथे माझी चुलती नामे अमिना बिबी यांनी तक्रार दिल्याने अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर माझे वडिलांचे विरोधात स.पो.आ., वडाळा विभाग कार्यालय येथे चाप्टर केस चालू करण्यात आली होती. सदर चाप्टर केससंदर्भात दिनांक ०९/०१/१८ रोजी माझे वडिलांना स.पो.आ., वडाळा विभाग कार्यालय येथे बोलाविले होते. सदर कार्यालयात माझे वडिल व मी गेलो असता तेथे हजर असलेले लोकसेवक जाधवसाहेब यांनी दिनांक ११/०१/२०१८ रोजी माझे वडिलांना पुन्हा हजर रहाण्यास सांगितले व येताना लाच म्हणून रू. २०००/– घेवून येण्यास सांगितले.

माझे वडिलांनी लोकसेवक जाधव यांना लाच देण्याची इच्छा नसल्याचे मला सांगितले. म्हणून मी व माझे वडिल असे आम्ही दिनांक ११/०१/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे गेलो व वडीलांसह वरिष्ठ अधिका–यांची भेट घेवुन त्यांचेकडे लोकसेवक जाधव यांचेविरोधात तक्रार असल्याचे सांगितले. त्यानंतर वरिष्ठांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पोलीस निरीक्षक श्री. गोविंद लाड यांना बोलावून घेतले व माझ्या तक्रारीबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक लाड व पोलीस निरीक्षक विनोद पवार यांनी मला त्यांच्या केबिनमध्ये बोलावून घेतले व माझी तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहून घेतली. त्यावेळी त्यांच्या केबिनमध्ये दोन इसम हजर होते. पोलीस निरीक्षक लाड यांनी ते दोन इसम शासकिय पंच असल्याचे मला सांगून मी दिलेला लेखी तक्रार अर्ज त्यांना वाचण्यास दिला. त्यावेळी दोन्ही पंचानी सदरचा तक्रार अर्ज वाचून त्यावर स्वाक्षरी केली व समक्ष म्हणून पोलीस निरीक्षक लाड यांनी स्वाक्षरी करुन सदरचा अर्ज त्यांच्याकडे ठेवून घेतला.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/०१/२०१८ रोजी दोन शासकीय पंचांसमक्ष स.पो.आ., वडाळा विभाग कार्यालय, शिवडी पोलीस ठाणे इमारत याठिकाणी जावून पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणीमध्ये लोकसेवक जाधव यांनी आम्हाला दिनांक १६/०१/२०१८ ही तुमच्या केसची शेवटची तारीख असल्याची सांगून नमूद दिवशी हजर रहाण्यास सांगितले.

त्याप्रमाणे दिनांक १६/०१/१८ रोजी जाधव यांना भेटावयास जावयाचे असल्याने मी पो.नि.लाड यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधला असता पो.नि.लाड यांनी मला व माझ्या वडिलांना दुपारी १५.३० वा. बी.पी.टी. गोडावून, शिवडी याठिकाणी परस्पर येवून थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे सदर ठिकाणी मी व माझे वडिल गेलो असता पो.नि.लाड, पो.नि.पवार व पथक तसेच दोन पंच असे आम्हास भेटले. त्यानंतर पंचांसमक्ष स.पो.आ., वडाळा विभाग कार्यालय, शिवडी पोलीस ठाणे इमारत याठिकाणी जावून पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक जाधव यांची भेट घेतली असता त्यांनी मला थोडा वेळ बाहेर थांबून रहाण्यास सांगितले. थोडया वेळानंतर लोकसेवक जाधव हे मला कार्यालयाच्या बाहेर येवून भेटले व त्यांनी मला चहापाण्याचे काय अशी विचारणा केली. सदर वेळी लोकसेवक जाधव यांनी माझ्याकडे पंचासमक्ष रू. २०००/– लाचेची मागणी केली.

Shahid

पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक जाधव यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने पोलीस निरीक्षक लाड यांनी पोलीस वाहनातच सापळापुर्व कारवाई केली. त्यावेळी लाचेकामी वापरण्यात येणारी रक्कम रुपये २०००/– ही मी पोलीस निरीक्षक लाड यांच्या ताब्यात दिली. पोलीस निरीक्षक श्री. लाड यांच्या सूचनेनुसार पोलीस वाहनाचे चालक महारनुर यांनी मला तसेच पंचाना अॅन्थ्रॉसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून सदर रक्कमेस अॅन्थ्रॉसिन पावडर लावून ती रक्कम माझ्या कुर्त्याच्या डाव्या खिशात अलगद ठेवली.

त्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगून पो.नि. लाड यांनी मला व पंचांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. लाड यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या शर्टच्या आतील बनियानला लावला.

त्यानंतर मी व माझे वडिल स.पो.आ., वडाळा विभाग कार्यालय, शिवडी पोलीस ठाणे इमारत याठिकाणी लोकसेवक जाधव यांची भेट घेण्याकरीता गेलो. त्यावेळी माझे वडिलांना चालण्यास त्रास होत असल्याने ते सदर कार्यालयापासून लांब थांबून राहिले. सदर ठिकाणी गेल्यानंतर लोकसेवक जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे मी त्यांचेशी मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी सदर कार्यालयाच्या जवळ असलेल्या पानाच्या टपरीवर येवून थांबण्यास सांगितले. काही वेळातच लोकसेवक जाधव हे मी थांबून राहिलेल्या पानाच्या टपरीजवळ आले. सदर ठिकाणी लोकसेवक जाधव आल्यानंतर मी त्यांनी मागणी केल्याप्रमाणे रू. २०००/– लाचेची रोख रक्कम त्यांचेसमोर केली असता ती त्यांनी स्विकारली. त्यानंतर मी लोकसेवक जाधव याने लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित ईशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक जाधव यांना रंगेहात पकडले.

माझे लोकसेवक जाधव यांच्याशी कोणतेही पूर्व वैमनस्य नसून माझे वडिलांच्या विरोधात असलेल्या चाप्टर केससंदर्भात मदत करण्यासाठी लोकसेवक जाधव यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन रुपये २०००/– स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे दिनांक १६/०१/२०१८ रोजी माझ्याकडून रुपये २०००/– लाचेची रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्याचेविरुध्द फिर्याद असून कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

समक्ष,

( गोविंद लाड)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.